# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १९२ वा ❑ भारतीय सौर दिनांक २५ भाद्र. शके १९४८, बुधवार दि.१६ सप्टेंबर २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### श्रीगणेश आगमनाने उजळला महाराष्ट्राचा उत्सव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

श्रावण सरताच वेध लागतात ते भाद्रपदात येणाऱ्या गणरायाचे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनाची चाहूल लागली की अवघ्या राज्याचे रूप पालटून जाते. यंदाचा हा गणेशोत्सव केवळ एक सण राहिला नसून तो खऱ्या अर्थाने एका अभूतपूर्व भक्तीचा आणि मांगल्याचा महासागर बनला आहे. या वर्षीच्या उत्सवाला एका अत्यंत दुर्मिळ अशा सुवर्णयोगाची किनार लाभली आहे. तब्बल ३१ वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर हरतालिका व्रत आणि श्रीगणेश चतुर्थी असा दोन्ही पर्वांचा संगम एकाच दिवशी जुळून आला आहे. यामुळे घराघरांत सनई-चौघड्यांचे सूर, धूप-उदबत्तीचा दरवळ आणि भक्तीचा अनोखा गंध अधिकच गडद झाला असून, अवघा महाराष्ट्र एका अथांग चैतन्यात न्हाऊन निघाला आहे.

भाद्रपद शुद्ध तृतीया आणि चतुर्थी या दोन्ही तिथी एकाच दिवशी आल्याने, यंदा स्त्रीवर्गाची आणि आबालवृद्धांची उत्साहाने धांदल उडालेली पाहायला मिळाली. पहाटेच्या मंगलमय वेळेत, सूर्योदयव्यापिनी मुहूर्तावर महिलांनी अखंड सौभाग्याचे आणि कडक उपवासाचे हरतालिका व्रत अत्यंत मनोभावे पूर्ण केले. त्यानंतर लगेचच मध्यान्हव्यापिनी मुहूर्तावर लाडक्या बाप्पाची प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी घराघरांत लगबग सुरू झाली. एकाच दिवशी उपवासाचे पावित्र्य आणि बाप्पाच्या आगमनाचा गगनाला भिडणारा आनंद, असा हा दुहेरी सोहळा प्रत्येक मराठी माणसाच्या मनात कायमचा कोरला गेला आहे. धर्मशास्त्र आणि परंपरेचा हा सुरेख मेळ यंदाच्या गणेशोत्सवाला एका वेगळ्याच आध्यात्मिक उंचीवर घेऊन गेला आहे.

कोणत्याही प्रांताचा, शहराचा किंवा गावाचा भेद न मानता, हा सण खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा उत्सव म्हणून नावारूपाला आला आहे. राज्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सर्वत्र एकच भक्तीभाव आणि एकच जयघोष घुमत आहे. यंदा राज्यभरात प्रशासनाने डीजेवर कडक बंदी घातल्याचे अत्यंत सकारात्मक चित्र दिसून आले. या डीजे बंदीमुळे कर्णकर्कश आवाजाला आणि ध्वनी प्रदूषणाला पूर्णपणे आळा बसला आहे. परिणामी, यंदाच्या उत्सवात पारंपरिक वाद्यांना खऱ्या अर्थाने मानाचे स्थान प्राप्त झाले असून, ढोल-ताशांचा दणदणाट, टाळ-मृदंगाचा ठेका आणि संबळ वादनाच्या निनादात बाप्पाचे राजेशाही थाटात स्वागत करण्यात आले. कुणी पायी चालत, कुणी सजवलेल्या रथातून, तर कुणी पारंपरिक पालखीतून आपल्या लाडक्या विघ्नहर्त्याला घरी आणले. ध्वनी प्रदूषणाला फाटा देत, पारंपरिक वाद्यांना दिलेली ही पसंती महाराष्ट्राच्या प्रगल्भ सांस्कृतिक जाणिवेची ओळख करून देते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि घरगुती गणपतींच्या माध्यमातून यंदा अनेक ठिकाणी सामाजिक भान जपणारे आणि प्रबोधन करणारे देखावे उभारण्यात आले आहेत. कृषी संस्कृती, शिक्षण, स्त्री-शक्ती आणि पर्यावरण संवर्धन अशा विविध विषयांवरून समाजाला दिशा देण्याचे काम या उत्सवातून होत आहे.

या उत्सवाचे सर्वात मोठे आणि विलोभनीय वैशिष्ट्य म्हणजे यातून पाहायला मिळणारी अभूतपूर्व सामाजिक एकता. लोकमान्य टिळकांनी ज्या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती, त्या खऱ्या अर्थाची प्रचिती आज या महाराष्ट्राच्या उत्सवात येत आहे. जात, पात, धर्म किंवा आर्थिक स्तर या सर्व सीमा ओलांडून प्रत्येक जण बाप्पाच्या चरणी लीन झाला आहे. सार्वजनिक मंडळांच्या मंडपात आरतीसाठी एकत्र येणारे हात असोत, वाद्यांच्या तालावर एकत्र ठेका धरणारी तरुणाई असो, किंवा एकमेकांना मदत करत उभारलेले देखावे असोत; या सर्वांमधून एकसंध आणि प्रगल्भ महाराष्ट्राचे दर्शन घडत आहे. सद्यस्थितीत समाजात घडणाऱ्या विविध राजकीय आणि सामाजिक घडामोडींच्या, तसेच आरक्षणाच्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर, बाप्पाचा हा उत्सव सर्वसामान्यांना एका माळेत गुंफून सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा एक भक्कम संदेश देत आहे.

आज अत्यंत भक्तीभावाने विराजमान झालेले गणराय पुढील काही दिवस सर्वांच्या दुःखांचे, विघ्नांचे हरण करून सुख, शांती आणि समृद्धीची उधळण करतील. आजपासून सुरू झालेला हा मांगल्याचा आणि भक्तीचा जागर आता थेट अंगारकी चतुर्थीपर्यंत असाच अखंड चालणार आहे. गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात एकवटलेला हा महाराष्ट्राचा उत्सव केवळ एक धार्मिक सोहळा न राहता, तो महाराष्ट्राच्या एकतेचा, संपन्न संस्कृतीचा आणि अथांग भक्तीचा एक जिवंत अविष्कार ठरला आहे.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहचे आयोजन

## मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाच्या निर्देशानुसार, ३ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



या बैठकीस उप आयुक्त पंकज पाटील, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, ग्रंथालय प्रमुख प्रतिभा मुनावत, ग्रंथपाल वर्षा जाधव, वैशाली थोरात यांच्यासह मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्यरत संस्थांचे प्रतिनिधी, साहित्यिक, अभ्यासक व कलाकार उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी अभिजात मराठी भाषा सप्ताह व अभिजात मराठी भाषा दिवसाच्या आयोजनाबाबत विविध सूचना मांडल्या. त्यामध्ये शहरात अनेक साहित्यिक वास्तव्यास असून त्यांची स्वलिखित पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. या स्थानिक साहित्यिकांच्या साहित्यकृतींना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या पुस्तकांचा महापालिकेच्या ग्रंथालयांमध्ये समावेश करण्यास तसेच विविध प्रसंगी महापालिकेच्या वतीने भेट स्वरूपात देण्यासाठी प्राधान्याने विचार करण्यात यावा, अशी सूचना उपस्थितांनी मांडली. स्थानिक कलाकारांनाही अशा उपक्रमांमधून प्रोत्साहन मिळत असल्याने, महापालिकेच्या विविध कार्यक्रमांमध्ये त्यांना प्राधान्याने सहभागी करून घ्यावे. तसेच, मराठी भाषा संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या विविध संस्था आणि व्यक्तींना महापालिकेच्या मराठी भाषा संवर्धनाशी संबंधित उपक्रमांमध्ये सहभागी करून घेऊन त्यांच्या अनुभव व योगदानाचा उपयोग करून घ्यावा, अशी सूचनाही यावेळी मांडण्यात आली.

## श्री गणेश : बाप्पा कशामुळे...?

**ज्योतिर्मय साहित्य**




हिंदू धर्मात प्रत्येक शुभकार्य सुरू करण्यापूर्वी भगवान श्री गणेशाची पूजा केली जाते. श्री गणेश हे भगवान शिव आणि पार्वती देवीचे पुत्र आहेत. त्यांचे बंधू कार्तिकेय आहेत.स्वरूप: गणेशाचे मुख हत्तीचे आणि शरीर मानवासारखे आहे. श्री गणेश भगवान हे विद्येचे देवता मानले जातात. श्री गणेश पूजन केल्याने बुद्धी, यश, कीर्ती, शक्ती याचे वर्धन होते. अशी मान्यता आहे.

श्री गणेशाची काही प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

विघ्नहर्ता: गणेश सर्व अडथळे दूर करतो, म्हणून त्याला विघ्नहर्ता म्हणतात.

विद्या व बुद्धी: तो बुद्धी, कला आणि खेळांचा देव मानला जातो.

श्री गणेशाची अनेक नावे आहेत : वक्रतुंड, एकदंत, गजानन, लंबोदर ही गणेशाची प्रसिद्ध नावे आहेत.

गणेश चतुर्थी या तिथीला श्री गणेशाचा विशेष उत्सव केला जातो: भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेशाची स्थापना केली जाते.

सार्वजनिक उत्सव: लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात १८९३ मध्ये केली.

मुख्य उद्देश: ब्रिटीश राजवटीत देशवासीयांना एकत्र आणणे, राष्ट्रभक्ती जागवणे आणि सामाजिक व राजकीय प्रबोधन करणे.स्वरूप:

याआधी घरगुती असलेली गणपतीची पूजा लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक स्तरावर नेऊन एका मोठ्या लोकोत्सवात रूपांतरित केली.




म्हणूनच आजही प्रत्येक घरामध्ये आध्यात्मिक स्वरूपात तर प्रत्येक गल्लीमध्ये गावात अनेक ठिकाणी आध्यात्मिक आणि सामाजिक एकतेच्या स्वरूपात श्री गणेशाचे दरवर्षी दहा दिवस पूजन केले जाते.

संस्कृतमधील पितामह किंवा बाप (वडील) या शब्दांवरून आणि प्राकृत-लोकभाषेच्या प्रवाहातून गणपतीसोबत बाप्पा हा आदरयुक्त आणि आपुलकीचा शब्द जोडला गेला.

हा शब्द कधीपासून आला याचे नेमके साल किंवा तारीख सांगणारा कोणताही अधिकृत ऐतिहासिक दस्तऐवज उपलब्ध नाही, परंतु महाराष्ट्रात संतकाळ आणि पेशवेकाळापासून किंवा त्याही आधीपासून लोकभाषेत देवाशी असलेले जिव्हाळ्याचे नाते दर्शवण्यासाठी हा शब्द रुजला असावा.

बाप्पा शब्दाचा अर्थ आणि पार्श्वभूमी आपुलकीचे नाते: बाप्पा म्हणजे वडील किंवा असे रूप ज्याच्यामध्ये देव आपल्या कुटुंबातील सदस्यासारखा वाटतो.

लोकसंस्कृती: महाराष्ट्राच्या वारकरी व लोकसंस्कृतीत ईश्वराला वडिलधाऱ्याचे किंवा आपल्या मुलाचे स्थान देऊन बाप्पा असे हाक मारण्याची परंपरा जुनी आहे.

जसं वडील आपल्या मुलांचं पालनपोषण करतात. त्यांना सांभाळतात कोणत्याही कठीण परिस्थितीत त्यांच्या सोबत कायम राहतात.

त्याचप्रमाणे गणपती देखील आपल्या भक्तांचं बापा प्रमाणे रक्षण करतो. त्यामुळे गणपतीला बाप म्हणजे जो आदर आणि प्रेम वडीलांना दिलं जातं तो आदर तिच माया आणि तोच विश्वास गणेशभक्त गणपतीवर ठेवतात. म्हणूनच श्रद्धा आणि आदरापोटी गणपतीला बाप्पा असं म्हटलं जातं. १८ व्या शताकानंतर या शब्दाची लोकप्रियता वाढत गेली आणि कालांतराने गणपतीला

''बाप्पा'' असे म्हणणं प्रचलित झालं.

## बहि:शाल गणेश व्याख्यानमाला

**ज्योतिर्मय साहित्य**



गणपती बाप्पा मोरया शब्द कानावर पडले अन आज अचानक भूतकाळ आठवला. काय छान दिवस होते ते. सगळीकडे गणेशोत्सव साजरा करतांना ठरवून नसले तरी तो खरा पर्यावरणपूरक उत्सव असायचा. प्लास्टिकचा वापर नव्हता तर कमीत कमी पैशात किंवा नैसर्गिक सजावट होती. विजेचा भरमसाठ वापर नव्हता तर काही प्रमाणात दिवे लावून वातावरण मंगलमय व्हायचं. कर्णकर्कश्श आवाज नव्हते पण मधुर संगीताच्या तालावर निखळ आनंदाची लयलूट होती. श्री गणेश १४ विद्या आणि ६४ कला यात पारंगत गणनायक. बुद्धीदायक गणरायाचा संगीत, गायन, वादन,नाट्यछटा, चित्रकला, हस्तकला अशा विविध कलेला चालना देणारा हा सोहळा. दरवर्षी आमच्या शाळेत गणेशोत्सव खूप आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा होत होता. पारंपरिक पूजन अगदी साध्या पद्धतीने करून शालेय गणेशाची स्थापना करायची. विद्यार्थी, शिक्षक तसेच कर्मचारी बंधू भगिनी यांना व्यासपीठावर येण्याची संधी द्यायची. गणेश वंदना, स्वागतगीत, अतिथींचे स्वागत,सुबक रांगोळी, सुविचार लेखन, संचलन, प्रस्तावना, आभार प्रदर्शन असे एकंदरीत नियोजन करायचे. दररोज व्याख्यानाच्या रूपाने एक पुष्प बाप्पा चरणी अर्पण करायचे. महाराष्ट्रातील अनेक नामवंत साहित्यिक, कलाकार, डॉक्टर, वकील, पोलिस अधिकारी, प्राध्यापक, शिक्षक असे सर्व क्षेत्रातील अनुभवी वक्ते कार्यक्रमात येऊन त्यांनी आपले विचार विद्यार्थ्यांसमोर मांडले. ज्ञान, विज्ञान, शालेय परंपरा, कला, संस्कृती,कायद्याचे ज्ञान, खेळ, योगासने, थोर संत व महापुरुष, समाज सुधारक अशा सर्वस्पर्शी विषयावर केलेले उद्बोधन यामुळे शालेय शिक्षणात चैतन्य निर्माण व्हायचे. हा उत्सव मुलांच्या चिरकाल स्मरणात राहील. जीवनात विविध पातळीवर तो अनुभव उपयोगी पडेल असा होता. या उपक्रमाला बहि:शाल गणेश व्याख्यानमाला असे संबोधले आहे. ही परंपरा ५२ वर्षापूर्वी प्राचार्य स्व.भाऊसाहेब मेरेकर यांनी सुरू केली. त्यानंतरच्या सर्व प्राचार्यांनी ती आज पर्यंत अखंड सुरु ठेवली. कोरोना काळातील अपवाद वगळता तिला खंड पडला नाही. ''बाप्पा तू बुद्धीची देवता आहे. कोणत्याही कार्याचा आरंभ तुझ्या पूजनाने होतो. विघ्नविनाशक, मंगलमूर्ती, प्रसन्न वदन, संकट निवारक आहेस. बाप्पा तुला सांगायचे एवढेच कारण आहे की, अशी बुद्धी सर्व गणेश भक्तांना दे. ज्यामुळे गणेशोत्सव समाजासाठी एक प्रेरणादायी, समाजोपयोगी व पर्यावरण पूरक होईल. सर्व समाजात एकोपा निर्माण होईल. मनात राष्ट्रभक्ती रुजेल. विज्ञान आणि तंत्रज्ञान याचा मानवी कल्याणासाठी योग्य वापर होईल. नारीशक्तीचे महत्व सर्वजण मानतील. मुलगा व मुलगी यातील भेद लोक मानणार नाही. एवढीचं नम्र विनंती.''सर्वांना सादर वंदन. गणपती बाप्पा मोरया!




## माझ्या घरातील बाप्पा.......




छत्रपती संभाजीनगर येथील चि. समर्थ व चि. समृद्धी प्रसाद बेदरे वय वर्षे १३, या जुळ्या भावंडानी घरच्या बाप्पासाठी आकर्षक देखावा केला आहे.



चि. अनुष्का वय १० वर्षे व चि. आरुषी संजय चव्हाण वय ७ वर्षे, गुलमोहर कॉलनी, एन ५ सिडको, छत्रपती संभाजीनगर येथील लहान मुलींनी कल्पकतेने केलेला हा सुंदर देखावा.



धनश्री व प्रथमेश विजय जोग कल्याण, ठाणे यांच्या घरातील बाप्पाची सुंदर सजावट




# जात्यावरच्या ओव्या......

अरे बरस पावसा
तळ गाठला विहीरीन
कशी भागवू तहान
जीव झुरतो काळजीनं ||८४६||

अरे बरस पावसा
तुझ्या पायी रे लक्ष्मी
आला गेला वेळेवर
सुखी होणार धरणी ||८४७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७३





ज्योतिर्मय साहित्य

**देहेदंडणेचे महा दु:ख आहे ।**
**महादु:ख ते नाम घेता न राहे ।**
**सदाशिव चिंतीतसे देव देवा ।**
**प्रभाते मनी राम चिंतीत जावा ।।७३।।**

अर्थ : देहाला कष्ट दिल्याने मोठया यातना होतात. परंतु रामनाम घेतल्याने या यातना राहत नाहीत. प्रत्यक्ष भगवान शंकर देखील देवाधिदेव म्हणजेच श्रीरामाचे चिंतन करतात. अशा श्रीरामाचे प्रभात समयी आपण चिंतन करावे.

( देहेदंडणे - देहाला कष्ट/यातना देणे )



विवेचन : अनेक लोक परमेश्वर प्राप्तीसाठी उपासतापास, नवस, तीर्थयात्रा आदी गोष्टी करतात. या सगळ्या गोष्टींनी देहाला कष्ट होतात. त्याच्या यातना किंवा दु:ख भयंकर असते. सर्वांनाच या गोष्टी शक्य होतील असेही नाही. नर्मदा परिक्रमा करणे अतिशय पुण्यप्रद मानले जाते. परंतु सर्वांनाच ते शक्य होईल अशातला भाग नाही. बद्रीनाथ, केदारनाथ ही अत्यंत पवित्र धामे आहेत. पण जर शारीरिक क्षमता नसेल तर त्यांची यात्रा करणे कठीण होते. देहाला त्रास देणारी होते. पूर्वीच्या काळी ऋषीमुनी तप:साधना करीत असत. त्यासाठी एकांतात जाऊन बारा बारा वर्षे तपश्चर्या करीत. कोणी एका पायावर उभे राहून तप करीत असे तर कोणी नदीच्या पाण्यात उभे राहून. असे अनेक प्रकार होते. या सगळ्या गोष्टींचा उद्देश देहाबद्दलची आसक्ती नाहीशी व्हावी आणि परमेश्वर प्राप्तीकडे मनाचा कल व्हावा असा असायचा. परंतु देहाला एवढे कष्ट देऊन सर्वांनाच परमेश्वर प्राप्ती होईल अशी शाश्वती नव्हती. शिवाय काही कारणाने तप करणे मध्येच थांबले तर सर्वच व्यर्थ जायचे.

परंतु नामसाधनेत असे कष्ट देहाला पडत नाहीत. नामसाधना सोपी आहे. तुकाराम महाराज देखील सांगतात,''नामसंकीर्तन साधन पै सोपे, जळतील पापे जन्मांतरीची.''मग एवढे सोपे साधन सोडून देहाला ताडन करणारी इतर साधने का अवलंबावीत ?

या संसारात देखील मानवी देहाला अनेक प्रकारचे कष्ट होतात. नानाविध त्रासांना सामोरे जावे लागते. प्रारब्धाने वाट्याला आलेले दु:ख भोगावेच लागते. या सगळ्या गोष्टीत शरीराला प्रचंड त्रास होतो. आपण म्हणतो की कोणी कोणाचे दुखणे वाटून घेऊ शकत नाही. हे खरेच आहे. प्रारब्धाने आलेले दु:ख ज्याचे त्यालाच भोगावे लागते. पण सगळ्या परिस्थितीत रामनाम औषधाचे काम करते. देहाला वेदना होतील पण रामनामामुळे तो त्रास मनापर्यंत पोहोचत नाही. देहाच्या दु:खावर इतर औषधे तात्पुरती काम करतात पण रामनाम त्यावर मात करण्याची शक्ती देते. मात्र ते औषध नियमितपणे घोट घोट पोटात जायला हवे.

**(क्रमश:)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||




@संजय काव्या पुणे 7743918559

✍️ प्रयत्न

प्रयत्न जर प्रामाणिकपणे केला तर नक्कीच यशस्वी होतो पण दाखवण्यासाठी केला तर नक्कीच फसतो, म्हणून प्रत्येक कार्य प्रामाणिकपणे करा. प्रयत्नाशिवाय कोणतीच गोष्ट साध्य होत नाही. "प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे" हे नेहमी लक्षात ठेवा.

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)

# नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु:खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

# गर्भ उपनिषद

कदाचित उद्या गर्भातील बालकांच्या भाव भावना कळण्या इतके तंत्रज्ञान विकसित होईल, व जे आपले उपनिषद सांगत आहेत, तेच अंतिम सत्य आहे, हे च सिद्ध होईल. गर्भ उपनिषदात पुढे असे म्हटले आहे की, या शरीराला शरीर का म्हणतात? कारण ज्ञानाग्नी दर्शनाग्नी आणि जठराग्नी या रूपात अग्नी राहतो. यात जठराग्नी खाल्लेले, प्यायलेले, चाटलेले आणि शोषलेले पचवतो. दर्शनाग्नी रूपे दाखवितो. ज्ञानाने प्रारब्ध करणे भोगण्यासाठी समोर आणतो अग्नीची शरीरात तीन स्थाने आहेत. आहवनीय अग्नी मुखात, गार्हपत्य अग्नी उदरात, दक्षिणाग्नी हृदयात असतो. आपल्या शरीरात 107 मर्मस्थाने, 180 संधी (सांधे) 109 स्नायू , 700 शिरा, 500 मज्जा, 360 हाडे, साडेचार कोटी रोम रंध्रे ,आठ तोळे हृदय, बारा तोळे जीभ, एक शेर पित्त, अडीच शेर कफ, पावभर शुक्र, दोन शेर चरबी याशिवाय आहाराच्या प्रमाणात मल मूत्र अनियमित असते. ही प्रमाणे जन्म घेणाऱ्या बालकाच्या शरीरातील आहेत.

हे पिप्पलाद ऋषींनी सांगितलेले मोक्ष शास्त्र आहे.

हे अचूक ज्ञान कुठलीही प्रयोगशाळा नसताना, कुठलीही यंत्रे नसताना, उपलब्ध साहित्य नसताना, ऋषीमुनींनी समाधी द्वारे या सर्व क्रिया प्रक्रिया अनुभवल्या व त्या त्यांनी शब्दबद्ध केल्या. यामुळे हेच अंतिम सत्य आहे, हे कदाचित आज ना उद्या विज्ञानही सिद्ध करील. आपल्या मनात आपल्या धर्म शास्त्रा बद्दल अभिमानाची सार्थ जाणीव यानिमित्ताने व्हावी या उद्देशासह हा लेख इथे संपवीतो.

## सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे



✍️वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### गणेशोत्सव एक फायदे अनेक

मित्रांनो आणि भारतभूमी वरील सर्व जनतेला आजपासून सुरु होणार्या "गणेशोत्सवच्या" शुभेच्छा. आणि या मंगलमूर्तिच्या येण्याने सर्वाच्या जीवनात शुभ घडो ही त्या बाप्पाच्या चरणी प्रार्थना करतो. आपण 18 व्या शतकात गणपतीपूजन करण्याचा शिरस्ता आहे. स्वातंत्र्यपूर्वी मुंबई पुण्यात या गणेशोत्सवाला सुरूवात होऊन आज शेदिडशे वर्षे झाली. त्यावेळी लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक व समाज जागृती होण्यासाठी हा ऊत्सव सुरू केला. तो आज खूप प्रगत व रूपांतर झालेला आपण पाहतो आहे. लोकांनी, समाज बाधवानी, मुलेमुली व तरूणांनी एकत्र येत लोकरंजनासह प्रबोधन, समाज ऋण व धर्म सद्भावना जागृतीसाठी या गजाननाचे पूजन, स्थापना व विसर्जन करतो. पण याबरोबरच अनेक सुधारणा, परिणाम फायदे होत आहेत. पहा. ज्यागोष्टी तंत्रज्ञानालाही शक्य झाल्या नाही, ते आपले सण करून दाखवितात. हेच सण फोन
बाजूला ठेवून माणसासी नाती जोडण्यासाठी प्रेरीत करतात. स्क्रीनसमोर जास्त वेळ देणार्या पिढीलाबाहेर पडण्याचे कारण हा ऊत्सव देतो. या गणेशोत्सवाला आणखी एक बाजू आहे, त्यावर आपण चर्चा करत नाही ती म्हणजे यातून होणारी आर्थिक व सामाजिक देवानघेवान खर्च होणारा पैसा एका हातातून दुसर्या हातात फिरत राहतो. म्हणून मित्रांनो आपल्या भारतीय कॅलेडरवर वर्षभर सणांची तेही सर्व धर्माच्या रेलचेल असते!! असो तुर्त आज थांबतो स्वस्थ राहा मस्त राहा सुख दु:खाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा सुप्रभात.



# जेवणानंतर कोथिंबीर चावून खाल्ल्याने पचन सुधारते

ज्योतिर्मय साहित्य

मेथी : मेथी हे मधुमेहींना वरदान आहेच. चवीच्या दृष्टीने पालेभाज्यांत मेथीचे महत्त्व फार मोठे आहे. मधुमेहाच्या प्राथमिक अवस्थेत मेथीची भाजी नियमित खाल्ली तर मेथीपूड मिसळून गव्हाची पोळी खाण्याची पाळी येत नाही. मेथीची पालेभाजी खाल्ल्यामुळे लघवीचा वर्ण सुधारतो. भूक सुधारते, पाचक स्राव वाढतात. बाह्येपचार म्हणून मेथी पालेभाजीचा लेप दुखणाऱ्या सांध्यावर करावा. दु:ख कमी होते. केस गळणे, कोंडा, केस निर्जीव होणे याकरिता मेथीच्या रसाने केस धुवावे.

राजगिरा : राजगिरा बियांचा वापर आहेच. राजगिरा पालेभाजी रक्तशुद्धीकरिता फार उपयुक्त आहे. गंडमाळा, क्षय, लघवीची जळजळ या विकारांत पालेभाजी किंवा त्या पानांचा वाटून लेप करावा. शरीरस्वास्थाकरिता लागणारी द्रव्ये राजगिरा पाने व बिया या दोन्हीही आहेत.

शतावरी : शतावरी पाने अगदी बारीक असतात. लहान मुलांच्या जुलाब, पित्त होणे, दातांचा त्रास या विकारांत रस द्यावा. पाने पौष्टिक आहेत. कंदातील स्तन्यजनन हे गुण पानात अल्प प्रमाणात आहेत. कुंडीत शतावरी शोभेकरिता लावतात. त्यातील पानांचा ताजा रस ताकद कमावण्याकरिता उपयुक्त आहे. गोवर, कांजिण्या, जीर्णज्वर, कडकी या विकारांत ही पालेभाजी पथ्यकर आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

शेपू : उग्र वासामुळे शेपूचा वापर कमी होतो. शेपूची पालेभाजी वात व कफविकारात फार चांगली. पाने स्वच्छ धुऊन घेतली की उग्र वास कमी होतो. अग्निमांद्य, पोटफुगी, गॅस, कुपचन या विकारांत लगेच गुण देणारी ही पालेभाजी आहे. सोबत जिरे, आले किंवा लसूण वापरावा. लहान मुलांच्या पोटदुखी, जंत, कृमी या तक्रारीवर एकवेळी दिलेली भाजी काम करते. ज्या स्त्रियांना मासिक स्राव व्यवस्थित येत नसल्यास त्यांनी काही दिवस शेपूची पालेभाजी खावी. विटाळ नियमित होतो. गळवे पिकण्याकरिता पानांचा लेप करावा. गंडमाळा विकारात पोटात घेण्याकरिता व बाहेरून पानांचा लेप अशा दोन्हीकरिता शेपूच्या पानांचा वापर करावा.

हादगा

हादग्याची फुले पांढरी किंवा जांभळ्या रंगाची असतात. चणापीठ पेरून हादग्याच्या फुलांची कोरडी भाजी फार चविष्ट होते. पूर्वी मिळणाऱ्या अनेक भाज्या अलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत. हादग्याला आगस्ता असे संस्कृत नाव आहे. आयुर्वेदीय औषधीकरणात मनशीळ शुद्धीकरिता हादग्याच्या पानांच्या रसाचा वापर सांगितला आहे. ठेचाळलेल्या भागावर किंवा जखमेवर पाने ठेचून बांधावी. जखम भरून येते.

****

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

**आगमन श्रीगणेशाचे**

मोठ्या थाटात आज
आगमन श्रीगणेशाचे पहा
घरोघरी छान झाले
टाळ्या,फटाक्यांसवे सुंदर
आतिषबाजी इथे होता
मन आनंदात न्हाले

आगमन गणेशाचे होता
आनंदले सान-थोर
भक्तीमय वातावरण झाले
गणेश आरती,मंत्रोच्चाराने
प्रसन्न मन होवून
सुख सोहळे अनुभवले

# "पसायदान एक चिंतन" या विषयावर प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी वचनी यांचे प्रवचन संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

नाशिक : अमृतकुंभ क्लासेस, नाशिक हे विद्यार्थी आणि पालकांसाठी नेहमीच नवनवे उपक्रम राबवत असतात. यातीलच एक म्हणजे संभाजीनगरचे सुप्रसिद्ध अभंग रचनाकार प्राध्यापक ज्ञानेश्वर कुलकर्णी यांचे पसायदान एक चिंतन या विषयावरील मार्गदर्शन होय.

९००० ओव्याचा वाग्यज्ञ पूर्ण केला आल्यानंतर निवृत्तीनाथ महाराजांच्या आज्ञेवरून ज्ञानेश्वर माऊलींनी विश्वाच्या कल्याणासाठी मागणं मागितलं आणि ते मागणं म्हणजेच पसायदान. पसायदानाची पार्श्वभूमी आणि पसायदान या विषयावर चिंतन असं अतिशय विद्वत्तापूर्ण आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांना सहज समजेल अशा सोप्या सहज भाषेत त्यांनी आपलं तत्व चिंतन मांडलं.

विद्यार्थ्यांना रुचेल पचेल अशा सहस्तेत मांडताना त्यांनी उपस्थित विद्वानांना मार्गदर्शक ठरेल असे चिंतन मांडलं. त्यांचा सत्कार क्लासेस संचालक श्री अशोक रामराव देशपांडे यांनी केला. या




कार्यक्रमात श्री मुकुंद कुलकर्णी, हरिदास वाघ, सौ कविता गायधनी, श्री गायधनी सर, प्रतिभा देवरे, सौ.विद्या ज्ञा कुलकर्णी, सौ. विजयालक्ष्मी मनेरकर उपस्थित होते.

या सर्व मान्यवरांचा सत्कार प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. मनिषा अशोक देशपांडे यांनी केले.

# माणुसकी...

**ज्योतिर्मय साहित्य**



आजच्या या धावपळीच्या जीवनात माणुसकी हा प्रकार आपण विसरत चाललो आहोत. म्हणतात देव दगडाच्या मूर्तीत नसून तो माणसात आहे मात्र आता माणसातले सुद्धा इमानदारी आणि माणुसकी आज जिवंत नाही ही सर्वात लज्जास्पद गोष्ट आहे. आज माणुसकीचा धागा आपणास तुटलेला दिसतो जो तो आपल्या धुंदीमध्ये दंग आढळून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खरंतर माणुसकीची खिडकी आपणा सर्वांना उघडी करून दिली आणि संत महात्म्यांनी आपल्याला माणुसकीने वागण्याची शिकवण दिली ती मात्र आपण विसरत चाललोय. सोशल मीडियाच्या या जगात आपण हरून बसलोय याचाच परिणाम म्हणजे माणसे माणुसकी हरवून बसलेत .आज कुठेतरी एखादी घटना घडल्यास त्या घटनेची चित्रीकरण (फोटो) काढण्यास आपण तत्पर असतो उदा. अपघाताची घटना घडल्यास आपण त्या घटनेचे चित्रकरण करतो, मात्र त्या अपघातग्रस्त व्यक्तीला आपण मदत करत नाही इथेच आपली माणुसकी माणुसकी लोप पावल्याचा प्रत्यय येतो आहे .

जर या विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माणुसकी लुप्त होत चाललेली असेल तर तंत्रज्ञान फायदा की तोटा हा विचार करण्याची वेळ आता आलेली आहे. मी मुळीच म्हणत नाही की विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करू नये मात्र फक्त माणुसकी नावाचा धागा सदैव जपत रहा माणसातल्या माणुसकीची तुट पाहून कवयित्री बहिणाबाई म्हणतात की –

''अरे माणसा माणसा, कधी होशील माणूस ''

खरं पाहायचं म्हटलं तर पशुपक्षी प्राण्यांमध्ये सुद्धा माणुसकी आहे त्यांची काळजी घेतली तर ते त्याची परतफेड कायम करत असतात. इतरांच्या उपकाराची सतत जाणीव ठेवून त्यांच्यावर प्रेम करतात .असं कधी घडत का एखाद्या प्राण्याला प्रेम दिल अथवा त्याचे संरक्षण केलं तर ते अपणास विसरुन गेलय म्हणून ? नाही असं कधीच घडत नाही ,कारण ती माणुसकी त्यांच्यामध्ये सदैव जागरूक असते मात्र आपलं दुर्दैव मात्र एवढंच की आपण मात्र आपली माणुसकीच हरवून बसलो आहोत.

तसं पाहिलं तर अजूनही काही प्रमाणात माणुसकी दिसून येते अजूनही प्रत्येक लोक माणुसकीने वागतात माणुसकीने बोलतात माझ्या निरीक्षणातून मला असे आढळून आले की जर कुणाचं मन जिंकायचा असेल तर पाहिजे ती फक्त माणुसकी आणि माणूस म्हणून जगण्याची कला. जसं बोटावर जखम झाल्यास आपणास पहिल्यासारखे हस्ताक्षर लिहिता येत नाही, त्याचप्रमाणे आपल्या बोलण्यातून जर एखाद्याचं मन दुखावलं गेलं तर पहिले इतकं त्याच्या मनात कधीच घर करता येत नाही. म्हणून सर्वात महत्त्वाची गोष्ट माणुसकी जपणं आजच्या काळाची गरज आहे, जी की आपण हरवत चाललो आहोत. या नव्या युगात नवीन माणुसकी जपत चला माणुसकीच्या नात्याने जगाशी नाते जोडत चला आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे माणुसकीने मानसा – माणसांची नाती गुंफत चला.

***

✍ युगवीर कोळकर
वर्ग - 9 वी ( विद्यार्थी )
छत्रपती संभाजीनगर

# ऋषिपंचमी निमित्त आरुणि विद्या मंदिरात भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित विविध स्पर्धांचे आयोजन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या आरुणि विद्या मंदिर, पुणे येथे ऋषिपंचमीच्या निमित्ताने विद्यार्थिनींच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी १५ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. चन्द्रहास सोनपेठकर यांनी परीक्षक म्हणून उपस्थित राहून विविध स्पर्धांचे परीक्षण केले. तसेच स्पर्धेपूर्वी विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांना मार्कंडेय ऋषींची प्रेरणादायी गोष्ट सांगितली.

या प्रसंगी आभा गटासाठी गणपती प्रसाद वेशभूषा, प्रभा गटासाठी गणपती पत्री वेशभूषा, विभा गटासाठी ऋषी वेशभूषा, इयत्ता पहिलीच्या



विद्यार्थिनींसाठी स्तोत्र पाठांतर, इयत्ता दुसरीसाठी ऋषिका वेशभूषा आणि इयत्ता तिसरीसाठी एक मिनिट स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध वेशभूषा, स्तोत्रपठण आणि वक्तृत्वकौशल्याच्या माध्यमातून आपली प्रतिभा सादर केली. त्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमाला आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण लाभले.

डॉ. चन्द्रहास सोनपेठकर यांनी विद्यार्थिनींच्या सादरीकरणाचे परीक्षण करताना त्यांच्या सर्जनशीलतेचे, आत्मविश्वासाचे आणि उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक केले. स्पर्धेपूर्वी विद्यार्थिनींशी साधलेल्या संवादातून आणि सांगितलेल्या छोट्या गोष्टीतून त्यांनी विद्यार्थिनींना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाचे आयोजन महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, आरुणि विद्या मंदिर, पुणे यांच्या वतीने करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. अक्षदा अनिरुद्ध कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकवृंदाने कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

ऋषिपंचमीच्या निमित्ताने भारतीय संस्कृती, ऋषीपरंपरा, स्तोत्रपरंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांशी विद्यार्थिनींचा आनंददायी परिचय करून देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# लोककला महोत्सवात साहित्यिक रज्जाक शेख सन्मानित

**ज्योतिर्मय साहित्य**

श्रीरामपूर – मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी छत्रपती संभाजीनगर येथे कै.पुंजाजी बाबा बहुउद्देशीय प्रतिष्ठान छत्रपती संभाजी नगर यांच्यावतीने महाकवी वामनदादा कर्डक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संयुक्त जयंती निमित्त आयोजित लोककलावंतांचा लोककला महोत्सव व सन्मान सोहळा २०२६ उत्साहात पार पडला. छत्रपती संभाजीनगर येथील कार्यक्रमात श्रीरामपूर जिल्हा अहिल्यानगर येथील कवी,साहित्यिक गझलकार,अभिनेते रज्जाक शेख यांनी महाराष्ट्राच्या पारंपारिक लोककला व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी केलेल्या भाषिक व सांस्कृतिक योगदानाबद्दल शाल,पुष्पगुच्छ, आकर्षक सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य समाज कल्याण मंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांचे हस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध समीक्षक माननीय कांबळे होते तसेच प्रमुख उपस्थितीत



दुग्धविकास व दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री तथा नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे , महाराष्ट्र सांस्कृतिक कला अभियानाचे राज्य उपाध्यक्ष श्रीराम घोडके, स्वागताध्यक्ष एकनाथराव त्रिभुवन, शाहीर अशोक बागुल,ग्रामीण कवी आनंदा साळवे, भीमशाहीर सुनील खरे, नंदकुमार खरात आदी मंडळी उपस्थित होते.शेख यांनी मराठी भाषा संवर्धन आणि संरक्षणसाठी अनेक कवीसंमेलनात जाऊन आपल्या कवितांचे सादरीकरण केले आहे.शेतीमाती आणि ग्रामीण जीवन हा त्यांचा कवितांचा मुख्य विषय. त्याचबरोबर दोन लघुपटात त्यांनी अभिनेते म्हणून अभिनय केलेला आहे.

राज्यस्तराव आयोजित विविध उपक्रम आणि भाषिक सांस्कृतिक सन्मानाबद्दल विविध स्तरातून कौतुक होत आहे.




**सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....**



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

**Dr Shaikh A H - 98606 99906**

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### दिवाळीच्या फराळामागचं अर्थशास्त्र आणि आईचं गणित

दिवाळी म्हटलं की आजही डोळ्यांसमोर सर्वप्रथम दिव्यांची रोषणाई येत नाही...
नवीन कपडे आठवत नाहीत...
फटाक्यांचा आवाजही आठवत नाही...
सर्वप्रथम आठवतो तो स्वयंपाकघरातून येणारा चकली, करंजी, लाडू आणि चिवड्याचा दरवळ... आणि त्या सुगंधात हरवलेली आई!
पहाटेच उठून केस बांधलेली, पदर खोचलेला, कपाळावर घामाचे थेंब आणि चेहऱ्यावर मात्र समाधानाचं हास्य...
ती स्वयंपाकघरात असायची.
आम्ही मात्र तिच्या भोवती घुटमळत असायचो.
"आई, झाली का चकली?" "आई, एक करंजी दे ना!" "आई, चिवडा चाखू का?"
ती रागावल्यासारखी म्हणायची—
"अरे, दिवाळीच्या आधीच सगळा फराळ संपवणार का?" पण तिच्या आवाजातला राग खोटा असायचा... कारण आम्ही पुन्हा पुन्हा मागतोय, याचाच तिला खरा आनंद असायचा.
आज विचार केला की वाटतं... त्या काळात फराळ कमी होता, पण आनंद भरपूर होता.
आज फराळाचे मोठमोठे बॉक्स मिळतात.
काजू कतलीचे आकर्षक पॅकेट्स...
ब्रँडेड चकल्या... तुपातले लाडू... ऑनलाइन ऑर्डर... एका क्लिकवर घरपोच फराळ!
पण त्या सगळ्यात एक गोष्ट मात्र हरवली आहे...
आईच्या हातावर लागलेलं पीठ...
करंजीच्या कडांना घातलेली तिची नक्षी...
आणि चकली तुटली की तिच्या चेहऱ्यावर उमटलेली काळजी!
आईसाठी फराळ बनवणं म्हणजे केवळ स्वयंपाक नव्हता. ते एक मोठं अर्थशास्त्र होतं.
आमच्या लहानपणी दिवाळीचा फराळ म्हणजे एक मोठा उत्सव असायचा. दिवाळीच्या कितीतरी दिवस आधीपासून आई आणि आजीची तयारी सुरू व्हायची. कोणत्या दिवशी बेसन आणायचं, किती किलो रवा लागेल, साखर किती घ्यायची, तेल किती लागेल... याचं एक वेगळंच गणित त्यांच्या डोक्यात सुरू असायचं.
विशेष म्हणजे, त्या काळात घरात मोठमोठ्या कॅल्क्युलेटरची गरज नव्हती.
आईचं डोकंच तिचा सर्वात मोठा हिशेब होता!
"यंदा चकल्या थोड्या जास्त करायच्या... मुलांना आवडतात."
"करंज्या कमी पडायला नकोत... पाहुणे येतील."
"शेजारच्या काकूंनाही द्यायच्या आहेत."
"मावशीकडे पाठवायचा डबा वेगळा ठेव."
घरात किती माणसं आहेत, कोणाला कोणता पदार्थ आवडतो, कोणाच्या घरी फराळ पाठवायचा, अचानक पाहुणे आले तर किती पुरेल... या सगळ्याचं गणित आईच्या मनात आधीच तयार असायचं. (क्रमशः)

## अभावातून प्रभावाकडे...



अपर्णा परांजपे, कात्रज पुणे. मो. 95030 45495

### विचारांच्या पलीकडे-साक्षीच्या प्रकाशात वर्तमान

पुढे......
भगवद्गीतेतील कर्मयोगाचे सूत्र येथे अत्यंत महत्त्वाचे आहे—
कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥
— भगवद्गीता २.४७
भविष्यावर आपला पूर्ण अधिकार नाही.वर्तमानातील कर्मावर आहे.
म्हणून—कर्म वर्तमानात करा; फलाची कल्पना करून वर्तमान गमावू नका.याचा अर्थ भविष्याची योजना करू नये असा नाही.
योजना करा.प्रयत्न करा.कर्तव्य करा.
पण मनाने भविष्यात जाऊन हजारो वेळा दु:ख किंवा विजय अनुभवू नका.
६. इच्छा — बंधन की साधन?
भगवान म्हणतात—
ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।
सङ्गात्सञ्जायते कामः
कामात्क्रोधोऽभिजायते ॥
— भगवद्गीता २.६२
विषयांचे चिंतन → संग → कामना → क्रोध.
ही मनाची साखळी आहे.
पण इच्छा आली म्हणून दोषी ठरायचे नाही.
इच्छा आली—ती पाहायची.
"मला हे मिळालेच पाहिजे" हा आग्रह कसा निर्माण झाला?
"हे मिळाले नाही तर मी अपूर्ण आहे" ही धारणा कुठून आली?
हे पाहता आले की इच्छा आपल्यावर राज्य करण्याऐवजी आपण तिचे निरीक्षण करू लागतो.
यालाच वैराग्याची सुरुवात म्हणता येईल.
७. साक्षी म्हणजे नेमके काय?
बृहदारण्यक उपनिषद् अत्यंत गहन वचन देते—
येन सर्वमिदं विजानाति तं केन विजानीयात् ।
— बृहदारण्यक उपनिषद् २.४.१४
ज्याच्या प्रकाशामुळे सर्व काही ज्ञात होते, त्याला कोणत्या साधनाने जाणणार?हा प्रश्न आत्मविचाराचा हृदयबिंदू आहे.डोळे वस्तू पाहतात.मन त्या दृश्याचा अर्थ लावते.बुद्धी निर्णय घेते.
पण—डोळे पाहत आहेत हे कोणाला कळते?
मन विचार करत आहे हे कोणाला कळते?
बुद्धीने निर्णय घेतला हे कोणाला कळते?
(क्रमशः)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'पती-पत्नी' (संसार रथाची दोन चाके)

'संसार हैं इक नदिया, दुख-सुख दो किनारे हैं, ना जाने कहाँ जाएं हम बहते धारे हैं...' जीवनाचं तत्त्वज्ञान सांगणारं हे एक अतिशय सुंदर गाणं! मला नेहमी असं वाटतं की या गाण्यातील दोन किनारे म्हणजे पती आणि पत्नी; जणू संसाररूपी नदीचे दोन भक्कम काठ. संसार नावाची जीवनदायिनी नदी या दोघांमधून वाहत असते. सुख-दुःखाचे एकमेकांचे सोबती असलेले हे किनारे एकमेकांना सदैव सांभाळून घेत असतात. कोणीतरी खूप छान म्हटलं आहे, "संसार दोघांचा असतो, दोघांनी आवरायचा असतो; एकजण चुकला तर दुसऱ्याने सावरायचा असतो!" काही काही वाक्ये सहजपणे संपूर्ण जीवनाचं सार सांगून जातात. पण हे तत्त्वज्ञान जोपर्यंत आपल्या अंतरंगात पोहोचत नाही, तोपर्यंत या सुंदर अशा सहजीवनाला प्रेमाचा खरा गोडवा प्राप्त होत नाही.

'नात्यांच्या महावस्त्रा'तील हा असा एक मूलभूत पदर आहे, ज्यामुळे या महावस्त्राला एक देखणी चौकट प्राप्त होते; आणि त्यातूनच महावस्त्रातील पुढची सर्व नाती जोडली जातात. लग्न ठरवून केलेले असो की प्रेमविवाह, लग्नानंतर दोन वेगवेगळ्या घरांत, वातावरणात आणि संस्कारांत वाढलेले दोन स्वतंत्र जीव एकत्र येतात. ते प्रेमाच्या रेशमी धाग्याने असे काही घट्ट बांधले जातात की, नंतर त्यांना एकमेकांशिवाय एक क्षणही करमत नाही! जेव्हा पत्नी चार दिवस माहेरी जाते, तेव्हा पतीच्या मनातील व्याकुळता या शब्दात व्यक्त होते

"नसतेस घरी तू जेव्हा, जीव तुटका तुटका होतो,
जगण्याचे विरती धागे, संसार फाटका होतो..."

लग्नानंतर थोड्याच दिवसांत सुरुवातीचे रम्य आणि मोहक वातावरण ओसरून संसारातील वारा, ऊन आणि पावसाचे वास्तव समोर दिसायला लागते. मग जीवनात असे कितीतरी प्रसंग येतात, ज्यावर केवळ एकमेकांच्या भक्कम साथीनेच मात करता येते. (क्रमशः)

# अभियांत्रिकी दिनानिमित्त एमआयटी पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थी व प्राध्यापकांचा गौरव

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - भारतरत्न अभियंता डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या अभियंता दिनाचे औचित्य साधून एमआयटी पॉलिटेक्निक, छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थी व प्राध्यापकांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

प्रारंभी प्राचार्य डॉ सुनिल देशमुख व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधींनी भारतरत्न डॉ. विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

पुरस्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी २०२६ परीक्षेत अनुप्रयुक्त गणित, संगणक प्रोग्रामिंग, अनुरूप व अंकीय संदेशवहन तसेच अभियांत्रिकी यामिकी या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळविणाऱ्या





दहा गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल प्रा. आर. ए. बुरकुल, प्रा. एस. एम. जंभाईकर, प्रा. व्ही. पी. बोंबटकर, प्रा. एस. ए. शेंद्रे, प्रा. के. एन. खांडके, प्रा. पी. व्ही. अमले, प्रा. आर. एस. कुलकर्णी व प्रा. एम. जी. कुलकर्णी यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.


कार्यक्रमास प्राचार्य डॉ. एस. जी. देशमुख, प्रा. आर. डी. देशपांडे व प्रा. एम. जी. ग्रंथी यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. देशमुख यांनी देशाच्या विकासासाठी तंत्रशिक्षणात सातत्याने गुणवत्तात्मक सुधारणा करणे आवश्यक असल्याचे सांगितले. विद्यार्थी व प्राध्यापकांनी शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. प्रा. आर. ए. बुरकुल यांनी विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे, सातत्याने व समर्पित भावनेने प्रयत्न केल्यास यश निश्चित मिळते, असे प्रतिपादन केले. संगणक विभागात संपन्न झाल्या कार्यक्रमात विभागप्रमुख प्रा. ए. एस. नागरिक यांनी भारतरत्न डॉ. विश्वेश्वरय्या यांच्या कार्यकर्तृत्वातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग समाजाच्या प्रगतीसाठी करावा, असे आवाहन केले. अभियांत्रिकी ही केवळ व्यावसायिक क्षेत्रापुरती मर्यादित नसून समाजविकास आणि राष्ट्रनिर्माणाचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी नमूद केले. जी. एस. मंडळाचे अध्यक्ष डॉ.वाय.ए. कवडे, एमआयटी समूह संस्थांचे महासंचालक प्रा. मुनीष शर्मा व प्राचार्य डॉ. एस. जी. देशमुख यांनी सर्व प्राध्यापक अभियंते तसेच भावी अभियंता विद्यार्थ्यांना अभियंता दिनाच्या शुभेच्छा दिल्या. प्रा. एम. जी. कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळेत वेगवेगळे उपक्रम राबविणारे जमदाडे सर (भाग २)

**ज्योतिर्मय साहित्य**

शिक्षक शाळेतील विद्यार्थ्यांना घडवित स्वत:मध्येही बदल घडवीत स्वतःच्या कुटुंबाची प्रगती घडवितो याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे माझ्या लोकमंगल हायस्कूल नागेवाडी- कुशी चे हरहुन्नरी शिक्षक आणि सध्या प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले शशीकांत जमदाडे. सन २००८ मध्ये त्यांची मुलगी शिवांजली शशिकांत जमदाडे हिने नवोदय विद्यालयातील प्रवेशाच्या परीक्षेसाठी प्रयत्न केलेला होता परंतु म्हणावे इतके तीच्या अभ्यासाकडे लक्ष जमदाडे सरांनी दिले नव्हते कारण मुलीची जात आणि परगावी शिक्षणासाठी ठेवायचे ही संकुचित वृत्ती त्यांच्या मनामध्ये होती. परंतु नंतर त्यांना कळाले की, त्यांच्या ओझर्डे (वाई तालुका) गावातील नितीन फरांदे हे प्राथमिक शिक्षक आणि त्यांची पत्नी शिक्षक असताना सुद्धा त्यांच्या एकुलत्या मुलीला त्यांनी नवोदय मध्ये शिक्षणासाठी ठेवलेले आहे. एक दिवस त्यांनी जमदाडे सरांना सातारा जिल्ह्यातील कोरेगांव रस्त्यावरील खावली येथील 'नवोदय विद्यालय' पाहण्यासाठी नेले. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात एक 'नवोदय विद्यालय' असून त्या त्या जिल्यातील विद्यार्थ्यांना तिथे प्रवेश मिळतो. पहिल्यांदाच जमदाडे यांनी ते हायस्कूल बघीतले आणि ते अतिशय खुश झाले.

या ठिकाणी असणारे 'सीबीएसइ' पद्धतीचं शिक्षण आणि शिवाय त्या



विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या सर्व फॅसिलिटीज अत्यंत उत्तम आहेत. महत्त्वाचं म्हणजे त्या ठिकाणी मिळणारे शिक्षण हेच अतिशय उत्तम रितीचे आहे. शिवाय पूर्ण जिल्ह्यातून क्रीम बॅच म्हणून जे ऐंशी विद्यार्थी निवडले जातात त्या विद्यार्थ्यांसाठी भरपूर कष्ट करून त्यांना ते विद्यालय घडवत होते. जमदाडे यांची दोन नंबरची मुलगी गीतांजली शशिकांत जमदाडे मात्र सातत्याने कष्टपूर्वक अभ्यासाने तसेच सरांच्या मार्गदर्शनामुळे सन २००९-१० या वर्षी ५ वी साठी 'नवोदय विद्यालयासाठी' निवडली गेली. पाचवी मध्ये ती शिकत होती तेंव्हा तिला संतोष शिंदे नावाच्या जमदाडे सरांच्या ओझर्डे गावातीलच प्राथमिक शाळेतील शिक्षकाने तिच्यामध्ये उमेद निर्माण केलेली होती. तसेच पहिलीपासून बुद्धिमत्ता, गणित या विषयाची तयारी जमदाडे पती-पत्नी




यांनी घरी करून घेतलेली होती. गीतांजली ची आई विजयमाला शशिकांत जमदाडे यांचा अभ्यास करून घेण्यामध्ये महत्वाचा वाटा होता. गीतांजलीचा चौथीच्या स्कॉलरशिप मध्ये दोन मार्कस कमी पडल्याने नंबर गेल्याने तिने अतिशय चांगल्या पद्धतीने नवोदय विद्यालयाच्या परीक्षेसाठी अभ्यास करून, जास्तीत जास्त प्रश्नपत्रिका सोडवून यश मिळविले. या यशामुळे गीतांजलीचा त्यावेळी खासदार प्रतापराव भोसले यांनी तिच्या घरी येऊन तसेच लोकमंगल हायस्कूल नागेवाडी-कुशी, दीपलक्ष्मी पत संस्था, ओझर्डे गावात आणि इतर ठिकाणी सत्कार करण्यात आला होता.

नवोदय मध्ये गीतांजली शिक्षणासाठी गेल्यानंतर तेथील शिस्तबद्ध वातावरण, तेथील उपक्रम आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केले जाणारे प्रयत्न हे बघून लोकमंगल हायस्कूल नागेवाडी-कुशी विद्यालयामध्ये जमदाडे सरानी सर्वांना बरोबर घेऊन विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविले. आदिती सुनील सावंत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये लोकमंगल हायस्कूल नागेवाडी- कुशी या शाळेतून ९४.८० टक्के दहावी मध्ये गुण मिळवून चांगल्या मार्कानें पास झाली. यावर्षी मी साधना साप्ताहिक मध्ये आलेला एक लेख आणि विद्यार्थ्यांस स्कॉलरशिप साठी ची जाहिरात त्या ठिकाणी पाठवलेली होती. जमदाडे सर आदितीच्या वडिलांना घेऊन माझ्याकडे आलेले होते. परंतु तिच्या वडिलांना विश्वास नव्हता. ते म्हणायचे कितीतरी स्कॉलरशिपच्या जाहिराती पेपर मध्ये येतात आपल्याला मिळणार आहे का?. आदितीचा फॉर्म ऑनलाईन पद्धतीने भरायचा होता. त्याकाळी ऑनलाइन फॉर्म भरण्याची माहिती जास्त नव्हती.

**(क्रमशः)**

# श्री.गणेशा आरोग्यअभियान २०२६ अंतर्गत वैजापूरात आरोग्य तपासणी शिबीर

**ज्योतिर्मय साहित्य**



वैजापूर - मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या वतीने श्री. गणेशोत्सव निमित्त १४सप्टेंबर ते २५सप्टेंबर २०२६ या दरम्यान राज्यभर शासनाच्या परिपत्रक नुसार'' श्री.गणेशा आरोग्य तपासणी अभियान-२०२६ आयोजित करण्यात आलेले आहे.याचा भाग म्हणून नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख व मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (ता,१५) रोजी मोरया गणेश मंडळाच्या ठिकाणी ''श्री.गणेशा आरोग्य तपासणी अभियान-२०२६'' जिल्हा आरोग्य समिती सदस्य तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत हे शिबिर घेण्यात आले. हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, पालिका भगवान महावीर रुग्णालय व तालुका आरोग्य वर्धिनी केंद्र यांच्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ.शुभम मित्रा, डॉ.प्रकाश राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ, खोकड (राजपूत), मुख्य नर्स निर्मला बोरगे, योगेश चव्हाण, अक्षय सूर्यवंशी, वैद्यकीय लॅब च्या सना शेख, सतीश त्रिभुवन, संगीता सिरसाट, अशोक गाडेकर यांनी,रुग्णांचे रक्त तपासणी, व आरोग्य तपासणी करून गोळ्या व औषधी ही रुग्णांना दिली. शहरातील गणेश मंडळांनी दररोज होणाऱ्या या शिबिराला सहकार्य करावे व जास्तीत जास्त रुग्णांनी तपासणी करून घेऊन आपल्या आरोग्यची काळजी घ्यावी असे आवाहन धोंडीराम राजपूत यांनी केले.


# पर्यावरणपूरक गोमय गणेश मूर्ती स्थापना

**ज्योतिर्मय साहित्य**

बीड - डॉ. हेडगेवार सार्वजनिक वाचनालयात गणेश चतुर्थी निमित्त वार्षिक परंपरेनुसार श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. पर्यावरण पूरक गोमय गणेश मूर्ती या वर्षीच्या गणेशोत्सवाचे वैशिष्टे होय.

यावेळी वाचनालयाचे कार्यवाह नंदकिशोर झरीकर. प्रा. शशिकांत पसारकर. यशवंत देशमुख. बाळासाहेब साळवे. सुरेश चव्हाण. रमाकांत शेरकर. सुरेश जाडे. आदी उपस्थित होते.





## पुराणातील विश्व : एक चिकित्सक अन्वेषण भाग-८

शांडिल्यगोत्रोत्पन्नभालेरावमुकुन्दोऽहम्
छत्रपतीसम्भाजीनगरम्
विद्युतसन्देशसूत्रम्-bhalerao.mukund@gmail.com
भ्रमणभाषक्रमान्क: ८३०८८३५३१३

### विष्णुपुराणातील विश्वरचना:इतर पुराणांशी तुलनात्मक संदर्भ

पूर्वार्ध:
विष्णुपुराणातील ग्रह-नक्षत्रांची मांडणी समजून घेतल्यानंतर पुढचा स्वाभाविक प्रश्न असा आहे. ही विश्वरचना केवळ विष्णुपुराणापुरती मर्यादित आहे का?
या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी इतर पुराणांतील विश्ववर्णनांकडे पाहणे आवश्यक आहे. कारण एखाद्या एकाच ग्रंथातील वर्णनावरून संपूर्ण पुराणपरंपरेची विश्वकल्पना ठरवणे योग्य ठरणार नाही. भारतीय पुराणपरंपरेत सृष्टी, भूगोल, लोक, सूर्य, चंद्र, नक्षत्रे, ग्रह आणि कालचक्र यांविषयी अनेक ठिकाणी वर्णने आढळतात. मत्स्यपुराण, वायुपुराण, भागवतपुराण, मार्कण्डेयपुराण आदी ग्रंथांमध्येही विश्वरचनेशी संबंधित विवेचन आहे. तपशील, क्रम आणि मोजमापांमध्ये काही फरक असला, तरी एक व्यापक सांस्कृतिक विश्वदृष्टी त्यामागे दिसते. यातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे भूगोल आणि विश्वरचना यांचे एकत्रित चित्रण. जम्बूद्वीप, विविध वर्षे, समुद्र, पर्वत, मेरू आणि त्याभोवतीची विश्वव्यवस्था यांचे वर्णन पुराणपरंपरेत विविध स्वरूपांत आढळते. यामुळे पुराणातील 'विश्व' ही केवळ आधुनिक अर्थाने अवकाशातील ग्रह-ताऱ्यांची व्यवस्था नाही. ती भूगोल, खगोल, धर्म, काल आणि आध्यात्मिक विश्व यांना एकत्र करणारी संकल्पना आहे.

■ भागवतपुराणातील साम्य
भागवतपुराणाच्या पाचव्या स्कंधात विश्वरचनेचे विस्तृत वर्णन येते. जम्बूद्वीप, मेरू, सूर्याचा मार्ग, चंद्र, ग्रह आणि विविध लोक यांची एक परस्परसंबंधित रचना तेथे मांडलेली आहे. विष्णुपुराणाशी तुलना केली असता काही मूलभूत संकल्पनांमध्ये साम्य जाणवते. विशेषत: मेरू, जम्बूद्वीप, सूर्य-चंद्र, नक्षत्रे आणि ग्रह यांचे स्तरित विश्वरचनेतील स्थान ही वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत,
परंतु दोन्ही ग्रंथांतील प्रत्येक तपशील समान आहे असे म्हणता येणार नाही. पुराणे दीर्घ काळ विकसित झालेल्या साहित्यपरंपरेचे प्रतिनिधित्व करतात; त्यामुळे त्यांच्या आवृत्त्यांमध्ये आणि वर्णनांमध्ये भिन्नता असणे स्वाभाविक आहे.
मत्स्यपुराण आणि वायुपुराण
पंचलक्षणांच्या संदर्भात आपण आधीच पाहिले आहे की मत्स्यपुराण आणि वायुपुराण यांमध्येही पुराणाच्या मूलभूत विषयांची चर्चा आहे. त्याचबरोबर या ग्रंथांमध्ये सृष्टी, वंश, मन्वंतर, भूगोल आणि विश्वरचनेशी संबंधित सामग्रीही आढळते. यातून एक महत्त्वाची बाब स्पष्ट होते की विष्णुपुराणातील विश्वकल्पना ही भारतीय पुराणपरंपरेतील व्यापक विश्वदृष्टीचा एक भाग आहे, म्हणून विष्णुपुराणातील एखादे मोजमाप किंवा विश्ववर्णन समजून घेताना त्याची तुलना इतर पुराणांशी करणे आवश्यक ठरते.

■ पुराणांतील भिन्नता का महत्त्वाची आहे?
जर सर्व पुराणांमध्ये अगदी एकसारखी विश्वरचना असती, तर एकच निश्चित प्राचीन मॉडेल असल्याचा दावा करणे सोपे झाले असते. परंतु प्रत्यक्षात आपल्याला विविध वर्णने दिसतात. ही भिन्नता दोष म्हणून पाहण्याची गरज नाही. उलट, ती पुराणपरंपरेच्या दीर्घकालीन विकासाचे आणि विविध बौद्धिक प्रवाहांचे निदर्शक असू शकते. भारतीय ज्ञानपरंपरेत एका विशिष्ट ग्रंथाने अंतिम आणि अपरिवर्तनीय वैज्ञानिक मॉडेल दिले, अशी कल्पना सर्वत्र लागू होत नाही. विविध ऋषी, आचार्य आणि परंपरांनी विश्व, काल, सृष्टी आणि मानवजीवन यांचा स्वतंत्र पद्धतीने विचार केला, म्हणून पुराणांचा अभ्यास हा एखाद्या 'एकमेव प्राचीन वैज्ञानिक सिद्धान्ताचा शोध' नसून विविध प्राचीन विश्वकल्पनांचा तुलनात्मक अभ्यास असायला हवा.
क्रमश: भाग-८: उत्तरार्ध



## आदरणीय गुरु नाट्याचार्य श्रीमती आशा सुनील कुमार

लेखिका: डॉ मीना श्रीवास्तव ठाणे मो. 99201 67211

पुढे.....
अरंगेत्रम म्हणजे गुरूंच्या दृष्टीने शिष्येचे पुरेसे भरतनाट्यम नृत्यप्रशिक्षण झाल्यावर त्यांच्या परवानगीने तिने नृत्यपदार्पणाद्वारे केलेला रंगप्रवेश. याच तयारीच्या टप्प्यात त्यांच्याशी आमचा संवाद बऱ्याच प्रमाणात वाढला, कारण त्या तिघी मुलींच्या शालेय परीक्षा आणि शिकवणी वर्गांचे व्यस्त वेळापत्रक लक्षात घेऊन, त्यांच्या समूह आणि एकल नृत्यांच्या सरावाचे अत्यंत विचारपूर्वक नियोजन करीत होत्या. शेवटच्या दोन महिन्यांत तर सहा ते आठ तासांच्या अनेक कठोर आणि तीव्र सराव नृत्य-सत्रांमुळे पालकांना आपल्या मुलींची काळजी वाटत होती,
पण या दूरदर्शी गुरूंचे संपूर्ण लक्ष मुलींच्या उणीवा दुरुस्त करण्यावर केंद्रित होते, जेणेकरून ११ जुलै २०२६ रोजी या परिपूर्ण समन्वय असलेल्या त्रिकुटाला रंगमंचावर त्यांच्या सर्वोत्तम रूपात सादरीकरण करता येईल. त्यातच अनुभूतीच्या कार्यक्रमाच्या केवळ एक आठवडा आधी, ४ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या भरतनाट्यम अरंगेत्रमसाठी त्यांनी दुसऱ्या एका त्रिकुटाला प्रशिक्षण दिले होते. या पारंपरिक नृत्यप्रकाराला समर्पित असलेल्या या ६० वर्षीय युवतीत अशी कोणती इच्छाशक्ती आणि ऊर्जा सामावलेली आहे, याचे मला आश्चर्य वाटत होते.
शेवटी गुरु नाट्यचार्य आशा मॅडम यांचे अथक प्रयत्न दोन्ही गटांच्या अत्यंत यशस्वी झालेल्या भरतनाट्यम अरंगेत्रम कार्यक्रमांमध्ये क्षणोक्षणी जाणवत होते आणि रंगमंचावर प्रत्यक्ष दिसून येत होते. त्यांनी आणि संस्कृती अकादमीच्या चमूने आपल्या अथक परिश्रमाद्वारे या मुलींमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवले होते, त्यामुळेच या तिघींनी रंगमंचावर एक कसदार आणि चमकदार भरतनाट्यम अरंगेत्रम सादर केले. ही अष्टपैलू स्त्री मुलींचे पोशाख, दागिने, मेकअप आणि केशभूषेपासून ते रंगमंचावरील नटराजाची भव्य दिव्य पूजा आणि प्रकाश व ध्वनीव्यवस्थेपर्यंत, कार्यक्रमाच्या प्रत्येक पैलूच्या अगदी बारीकसारीक तपशिलांवर देखरेख करत असल्याचे पाहून मी थक्क झाले. (क्रमश:)




भाद्रपद शुक्ला पंचमी, ऋषिपंचमी { दिनांक : १६ सप्टेंबर २०२६}

## प्रथम आत्मधर्म : उत्तम क्षमा धर्म

आत्म्यामध्ये क्रोध अर्थात् रागाच्या अभाव रूप शांतीस्वरूप अवस्था उत्पन्न होणे यास उत्तम क्षमा असे म्हटले आहे. क्रोध किंवा रागास अग्नीची भयंकर अशी उपमा दिली जाते.
_क्रोधोदयात भवती कस्य न कार्य हानी_
अर्थात् क्रोधामुळे, रागाने सर्व प्रकारच्या कार्याची हानी होते. त्यास शांत करण्यासाठी क्षमा रुपी शांतीजल हेच सर्वस्वी समर्थ आहे. ज्या प्रमाणे जलाचा मूळ स्वभाव शितलता आहे, त्याच प्रमाणे आत्म्याचा जीवाचा मूळ स्वभाव शांती हा आहे. हा स्वभाव क्षमेने प्रकट होतो. क्रोधाने अंध व्यक्ती स्वत:चे आणि त्या सह दुसऱ्याचे ही मोठे नुकसान करतो. क्षमा ही अत्यंत उदार आणि व्यापक अशा हृदयामध्ये वास्तव्य करते. चंदन स्वत: झिजून सुगंध, शीतलता देते. क्षमा संयम आणि सहनशीलतेने विकसित होते.
_क्षमा वीरस्य भूषणम_ अर्थात क्षमा हे वीरांचे भूषण आहे. क्षमाशील स्वभावानेच शूरवीर देखील महान गणले जातात. स्वार्था मुळे स्वभावात क्रोध, मान, माया, लोभ हे कषाय म्हणजेच आत्मशत्रू उत्पन्न होतात. अशा अवस्थेमध्ये द्वेष युक्त क्रिया कर्माने आत्म्याचे मोठे नुकसान होऊन तो संसारामध्ये परत परिभ्रमण करतो. मुक्ती पासून दूर जातो. आणि व्यवहारातही अस्थिरता निर्माण होते. म्हणून क्षमाशीलता धारण करणे आत्म्याच्या उत्कर्षासाठी, शांतीपूर्ण प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून उत्तम क्षमा हाच आजच्या दशलक्षण धर्मातील प्रथम प्रमुख विचार आहे.

बलराज संघई, छत्रपती संभाजीनगर 9420015208

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559